0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ३०/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८५/२०११/जा.९७३ दिनांक ०१/१२/२०११ व १६/१२/२०११.

३) मे. एशियन ऑईल कंपनी यांचे दि.२७/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन व कागदपत्रे.

४) मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांचे दि.२७/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन व कागदपत्रे.

५) मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. यांचे दि.२७/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन व कागदपत्रे.

६) टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक यांचे वतीने दिनांक २७/१२/२०११ रोजीचे प्राप्त लेखी निवेदन व कागदपत्रे.

७) मे. एशियन ऑईल कंपनी यांचे दि.२७/१२/२०११ रोजी फॅक्स संदेशामार्फत प्राप्त निवेदन.

८) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा टी.टी. पोलिस ठाणे यांचे दिनांक ०२/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

९) संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून दि.०४/०२/२०१२ रोजीचा प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवाल.

१०) संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना या कार्यालयाकडून दि.०९/०२/२०१२ रोजी निर्गमित केलेले पत्र.

११) संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून दि.३१/०३/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८५/२०११/जा.222
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : १७ /०४/२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २१/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी, सहाय्यक पोलिस निरिक्षक, वडाळा टी.टी. पोलिस ठाणे तसेच दोन पंचासह ठिक १०.०० वाजता आयमॅक्स टॉकीज येथून शासकीय व खाजगी वाहनाने वडाळा ट्रक टर्मिनसच्या दिशेने निघाले. तसेच सदर विभागात टेहळणी करत करत पथक पुढे पुढे जात असतांना सदर विभागातील ओसाड मोकळ्या जागेत

रस्त्याच्या आतमधील बाजूला एका ट्रकच्या आडोशाला संशयास्पद हालचाल होत असल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी पथकाने व पंच यांनी दोन व्यक्तीस ताब्यात घेतले. सदर व्यक्तीपैकी एका व्यक्तीस त्याचे नांव गांव विचारले असता, त्याने त्याचे नांव सद्दाम अब्दुल हई खान असे सांगून वडाळा-शिवडी परिसरातील गाडी अड्डा येथे गाडीमध्येच राहत असल्याचे सांगितले. तसेच मुळगांव सुजाणपूर, मनधत्ता, प्रतापगड, उत्तरप्रदेश असे असल्याचे सांगितले. तसेच अवधेश ट्रेड लिंक या ट्रान्सपोर्टरकडे मागील एका महिन्यापासून ३०००/- रुपये प्रती माहे पगार असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासह गाडी भरल्याबाबतचे कागदपत्र त्यांच्याकडून मागितले असता, त्यांनी ते गाडीतून काढून अधिकाऱ्यांना दिले. तसेच दिनांक २१/११/२०११ रोजी दुपारी ४.४० वाजता गोदी येथून टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मध्ये ऑईल चलन क्रमांक १९३१५७ अन्वये 7 ON Base Oil एकूण वजन १६.३८० भरुन घेऊन सदरचा माल जय हिंद मिल्स, अकाऊंट विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि., भांडूप, मुंबई येथे घेऊन जाणार असल्याचे सांगितले. तसेच तो स्वत: व क्लिनर केतन सुरज यादव टँकर घेऊन ट्रक टर्मिनल येथून ओसाड मोकळ्या जागेत आणल्याचे अधिकारी व पंचासमक्ष सांगितले. तेथे त्या दोघांनी मिळून सदर टँकरमधून पेट्रोलियम पदार्थ चोरुन काढत असतांना अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्यांना ताब्यात घेतले. सदरचा पेट्रोलियम पदार्थ चोरीने काढून तेथील परिसरातील विकत घेणाऱ्या व्यक्तींना विकणाच्या इराद्याने ते सदर काम करीत असल्याचे अधिकारी व पंचासमक्ष कबूल केले. सदर पेट्रोलियम पदार्थ विकून येणाऱ्या पैशाचा वापर ते त्यांच्या वैयक्तीक गरजांसाठी करणार असल्याचे त्यांनी अधिकारी व पंचासमक्ष सांगितले. तसेच सद्दाम अब्दुल हई खान यांच्या सोबतच्या दुसऱ्या व्यक्तीस त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नाव केतन सुरज यादव असे सांगून मूळगांव सदहापट्टी, प्रतापगड, उत्तरप्रदेश असे सांगून वडाळा शिवडी परिसरातील गाडी अड्डा येथे गाडीमध्येच रहात असल्याचे सांगितले. तसेच अवधेश ट्रेड लिंक या ट्रान्सपोर्टकडे एक महिन्यापासून प्रति माह रुपये १०००/- प्रमाणे क्लिनरची नोकरी करीत असल्याचे सांगितले.

दिनांक २१/११/२०११ रोजी दुपारी ४.४० वाजता ड्रायव्हर सद्दाम अब्दुल हई खान यांच्या समवेत गोदी येथून ऑईल चलन क्रमांक १९३१५७ अन्वये टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मध्ये 7 ON Base Oil एकूण वजन १६.३८० भरुन घेऊन सदरचा माल जय हिंद मिल्स, अकाऊंट विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि., भांडूप, मुंबई येथे घेऊन जाण्यासाठी निघालो असल्याचे सांगितले. तसेच त्यानंतर सदर टँकर घेऊन वडाळा ट्रक टर्मिनल येथील ओसाड मोकळ्या जागेत येऊन पोहचल्याचे सांगितले. तसेच त्या दोघांनी मिळून सदर टँकरमधून पेट्रोलियम पदार्थ चोरुन काढत असतांना अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले. सदरचा पेट्रोलियम पदार्थ चोरीने काढून तेथील परिसरातील विकत घेणाऱ्या व्यक्तींना विकणाच्या इराद्याने ते सदर काम करीत असल्याचे

अधिकारी व पंचासमक्ष कबूल केले. सदर पेट्रोलियम पदार्थ विकून येणाऱ्या पैशाचा वापर ते त्यांच्या वैयक्तीक गरजांसाठी करणार असल्याचे त्यांनी अधिकारी व पंचासमक्ष सांगितले.

त्यानंतर अधिकारी व पंच सदर विभागात इकडे तिकडे पहात असतांना तेथे दुसरा टँकर बेवारस स्थितीमध्ये आढळला. अधिकारी व पंच सदर टँकरच्या दिशेने पोहोचले असता, टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ या टँकरचा नॉब उघडलेल्या अवस्थेमध्ये आढळला. परंतू सदर ठिकाणी कोणतीही व्यक्ती आढळली नाही. तसेच टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ दिसला. त्या दिशेनेही अधिकारी व पंच गेले असता, तेथेही कोणीही व्यक्ती निदर्शनास आली नाही. परंतू अस्त्यावस्त पडलेले २२० लिटर क्षमतेचे तसेच ३५ लिटर क्षमतेचे काळ्या रंगाचे ड्रम तसेच इतर साहित्य आढळले. यावरुन अधिकाऱ्यांची व पंचाची पक्की समझ झाली की, सदर ठिकाणी पेट्रोलियम पदार्थाची अनधिकृतपणे खरेदी, विक्री होत आहे आणि त्यामुळेच भिती पोटी सदर ठिकाणावरील इतर व्यक्ती तेथून पळून गेल्या असाव्यात.

अशाप्रकारे टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चा चालक सद्दाम अब्दुल हई खान व क्लिनर केतन सुरज यादव यांनी गोदी येथून भरलेला भोदुमल आणि कंपनी, कस्टम हाऊस, एजंट नं. ११/०२४१, अशोक चेंबर, देवजी रजनशी मार्ग, मुंबई - ९ येथून भरलेला 7 ON Base Oil चा टँकर कागदपत्रात नमूद केल्याप्रमाणे जय हिंद मिल्स, अकाऊंट विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि., भांडूप, मुंबई येथे नेणे आवश्यक असताना चोरी करण्याच्याच हेतूने वडाळा ट्रक टर्मिनस येथील ओसाड/पडीक जागेत आणून अंधाराचा फायदा घेऊन सदर टँकरमधून स्वतःच्या फायद्यासाठी ३५ लिटर क्षमतेच्या काळ्या कॅनमध्ये सदरचा पेट्रोलियम पदार्थ काढल्याची पूर्ण खात्री झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ तसेच (२) दि पेट्रोलियम प्रोडक्टस् (मेटेंनन्स ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲण्ड सप्लाय) ऑर्डर, १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा येथे वि.स्था.गु.र.क्र. १९/२०११, दि.२२/११/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ | १ नग | १२,००,०००/- |
| ३ | टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ | १ नग | २,५०,०००/- |
| ४ | टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मधील 7 ON Base Oil | १६३४५ लि. | १०,७८,७७०/- |
| ५ | टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ मधील 7 ON Base Oil | १६८३५ लि. | ११,०४,१४१/- |
| ६ | २२० लि. क्षमतेचे भरलेले ड्रम सहीत | ८ नग | १,२०,८००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | २२० लि. क्षमतेचे रिकामे ड्रम | ५४ नग | ४३,२००/- |
| ८ | ३५ लि. क्षमतेचे भरलेले कॅनसहीत | ९ नग | २०,९२५/- |
| ९ | ३५ लि. क्षमतेचे रिकामे कॅन | १९ नग | ९५०/- |
| १० | नरसाळे (प्लास्टीक) | २ नग | २००/- |
| ११ | नरसाळे (पत्रा) | १ नग | २००/- |
| १२ | लोखंडी पाना | १ नग | ४००/- |
| १३ | प्लास्टीक बादली | २ नग | २००/- |
| | | एकूण | ५०,१९,७८६/- |

त्यानंतर सदर मुद्देमालासह अधिकारी वर्ग व पंच वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे, मुंबई - ३७ या पोलिस ठाणेकडे रवाना होऊन जप्त मुद्देमालासह हजर झाले. अधिकाऱ्यांनी सदर जप्त मुद्देमाल वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे यांच्या ताब्यात दिला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा येथे वि.स्था.गु.र.क्र. १९/२०११, दि.२२/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक १३/१२/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. चे सहाय्यक व्यवस्थापक श्री. रोहित रामदेव हलवाई, अवधेश ट्रेड लिंक्स या ट्रान्सपोर्टरचे सुपरवायझर श्री. संतोषकुमार पारसनाथ पांडे, टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चे मालक म्हणून उपस्थित इसम नामे कन्हैयालाल ब्रिजभुषण मिश्रा तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक यांच्या वतीने उपस्थित इसम नामे संतोष गणपत पाचणेकर या सर्वांनी उपस्थित राहून त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी संयुक्त लेखी निवेदन सादर करुन पुढील १५ दिवसानंतरची सुनावणीची तारीख मिळण्याची विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक २७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. एशियन ऑईल कंपनीच्या वतीने श्री. विनय के. वोरा, मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. या कंपनीच्या वतीने सहाय्यक व्यवस्थापक श्री. रोहित हलवाई, मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. या कंपनीच्या मालकीचे टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ च्या वतीने कन्हैयालाल ब्रिजभुषण मिश्रा तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक यांचे वतीने संतोष गणपत पाचणेकर या सर्वांनी उपस्थित राहून अनुक्रमे वाचावे क्र. ३, ४, ५ व ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. अवधेश ट्रेड लिंकच्या मालकाच्या वतीने संतोष

पांडे हे उपस्थित होते. परंतू लेखी निवेदन सादर केले नाही. तथापी, तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

सबब, तपासी पोलिस अधिकारी यांच्या लेखी अभिवेदन तसेच रासायनिक पृथ:करण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. एशियन ऑईल कंपनीच्या वतीने श्री: विनय के. वोरा यांनी युक्तीवाद केला की, आपल्या विभागाच्या फिरते पथकाने दि.२१/११/२०११ रोजी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५२२८४७७ दि.१८/११/२०११ अन्वये आयात केलेला बेस ऑईलचा साठा जप्त केला असून सोबत ज्वाईन्ट डायरेक्टर जनरल ऑफ फॉरीन ट्रेड, मुंबई यांचे आगाऊ प्राधिकारपत्र जोडण्यात आले आहे. ते लाईट लिक्वीड पॅराफिनचे उत्पादक व निर्यातदार असून सदरचे उत्पादन प्लॉट क्र. ५७, जवाहर को-ऑपरेटिव्ह इंडिस्ट्रियल इस्टेट, कामोठे, पनवेल, जिल्हा रायगड येथील फॅक्ट्रीवर केले जात असल्याचे सांगून त्यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ च्या मालकाशी किंवा चालक अथवा क्लिनर यांच्याशी संबंध नसून त्यांचा निर्यातीवर परिणाम होत असल्याचे सांगून सदर टँकरमधील जप्त करण्यात आलेला बेस ऑईलचा साठा मुक्त करण्यास विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित सहाय्यक व्यवस्थापक श्री. रोहित हलवाई यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी बेस ऑईलचा साठा मे. हायसिज बेसिस ऑईल यांचेकडून खरेदी केला असून तो मुंबई डॉक येथील सिमाशुल्क विभागास सिमाशुल्क भरुन तसेच इतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केली आहे. सदरचा साठा त्यांनी मे. अवधेश ट्रेड लिंक यांना डॉकमधून त्यांचे भांडूप येथील जयहिंद ऑईल मिल येथे नेऊन साठवणूकीकरिता नेमले होते. त्यांचेकडे सदर साठ्याचे मालकीबाबतचे सर्व कागदोपत्री पुरावे उपलब्ध असून ते सोबत जोडले आहेत. त्यांचे कंपनीचा अथवा कंपनीच्या भागीदारांचा सदरच्या जप्त बेस ऑईल साठ्यासंबंधीच्या गुन्ह्यात सहभाग नसून सदरचा साठा नाशवंत असल्याने पोलिस ठाणेच्या आवारात तसाच पडून राहिल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदरचा साठा लवकरात लवकर मुक्त करुन परत करण्यात यावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. या कंपनीच्या मालकीचे टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ च्या वतीने उपस्थित कन्हैयालाल ब्रिजभुषण मिश्रा यांनी युक्तीवाद केला की, टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ हा मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. या कंपनीच्या नावे असून सोबत टँकर

संबंधिचे कागदपत्रे जोडण्यात आले आहे. सदर गुन्ह्यामध्ये त्यांचा अथवा टँकरच्या मालकाचा सहभाग नसल्याने त्यांचा नमूद टँकर जप्त करण्यात येऊ नये. तसेच सदरहू टँकरमधील १६,३८० कि.ग्रॅ. बेस ऑईलचा साठा हा मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांचे मालकीचा आहे. तरी पोलिस ठाणेच्या आवारात उभा असलेला व जप्त करण्यात आलेला त्यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ या वाहनास दैनदिन देखभालीची गरज असल्याने व तसे न केल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक यांचे वतीने उपस्थित संतोष गणपत पाचणेकर यांनी युक्तीवाद केला की, श्रीमती सुप्रिया संतोष पाचणेकर ह्या सदरहू टँकरचे मालक असून त्यांनी टँकरचे सांभाळ करण्याकरिता प्राधिकृत केल्याचे मुखत्यारपत्र दिले आहे. सदरचा टँकरच्या मालकीबाबतचे सर्व पुरावे निवेदनासोबत जोडले असून नमूद गुन्ह्यामध्ये त्यांचा अथवा टँकर मालकाचा सहभाग नाही. त्यांच्या टँकरमधील १६,८७० कि.ग्रॅ. बेस ऑईलचा साठा मे. एशियन ऑईल कंपनी यांच्या मालकीचा आहे. तरी पोलिस ठाणेच्या आवारात उभा असलेला व जप्त करण्यात आलेला त्यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ या वाहनास दैनंदिन देखभालीची गरज असल्याने व तसे न केल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. एशियन ऑईल कंपनीचे दिनांक २७/१२/२०११ रोजी फॅक्स संदेशद्वारे प्राप्त झालेल्या लेखी निवेदनामध्ये, त्यांना सुनावणीची संधी देण्यात आल्याने आभार मानून या कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईचे समर्थन करुन त्यांचा अनावश्यकरित्या जप्त करण्यात आलेला साठा त्वरीत मुक्त न केल्यास त्यांच्या कंपनीचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचे नमूद केले. आपल्या कार्यालयास जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत प्राप्त असलेल्या न्यायिक अधिकारांमध्ये कोणतेही अतिक्रमण केले नसून ते निर्यातदार असल्याने त्यांना निर्यातदार म्हणून लागू असणाऱ्या सुविधा नियमानुसार देण्यात यावे. निर्यातदारांकरिता सन २००९-२०१४ या कालावधीच्या निर्गमित करण्यात आलेल्या ऐक्सिम पॉलिसीनुसार कोणत्याही प्राधिकरणास उत्पादनास आवश्यक असणाऱ्या साधणाचे जप्तीचे अधिकार नसून काही अंती प्रथमदर्शनी असलेल्या पुराव्यानुसार साठा जप्त केल्यास तो ७ दिवसात मुक्त करावा, असे नमूद करुन आपल्या कार्यालयास प्राप्त असलेल्या न्यायिकवत अधिकारान्वये प्राथम्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याचे विनंती केलेली आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा टी.टी. पोलिस ठाणे यांचे टपालामार्फत प्राप्त दि.०२/०१/२०१२ रोजीच्या लेखी अभिवेदनात, यातील अद्यापपर्यंतच्या तपासादरम्यान सदर टँकरमधील पेट्रोलियम पदार्थ चोरुन काढून तेथील परिसरातील नमूद माल विकत घेण्याऱ्या व्यक्तींना विकण्याच्या इराद्याने सदर काम करत असल्याचे अटक

आरोपींनी सांगितले. या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टँकर मालकांचा काहीही सहभाग दिसून येत नाही. तसेच यातील मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीक्यु-५३७६ व मो. टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ याचे चालक हे सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असून त्यांना अद्याप अटक करणे बाकी आहे. त्याचप्रमाणे सदर गुन्ह्यातील मोटार टँकर व टेम्पो हे पोलिस ठाणेच्या ताब्यात असून सदर वाहनातील तेलाचे नमूने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले असून सदर वाहनातील तेल हे ज्वलनशिल असल्याने सदर गुन्ह्याच्या तपासासाठी सदर वाहनांची किंवा वाहनातील तेलाची या पोलिस ठाणेस गरज नाही. तरी सदर मालमत्तेच्या विल्हेवाटीसंबंधी नियमाप्रमाणे व कायद्याच्या तरतुदीप्रमाणे योग्य तो निर्णय घेण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून दिनांक ०४/०२/२०१२ रोजीचा प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालामध्ये "Exhibit Nos. 1 and 2 contain paraffin oil " असे नमूद केले आहे. तथापी, मे. एशियन ऑईल कंपनी व मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. या दोन्ही कंपन्यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीचे छायांकित प्रतिंचे अवलोकन केले असता, त्यामध्ये आयात केलेला साठा हा 7 ON Base Oil असल्याचे नमूद असल्याने पृथ:करण अहवालामधील नमूद पॅराफिन ऑईल याची व्याख्या अथवा दोन्ही पदार्थामधील फरक याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना दिनांक ०९/०२/२०१२ रोजी या कार्यालयाकडून पत्र निर्गमित करण्यात आले.

संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून दि.३१/०३/२०१२ रोजीच्या प्राप्त अहवालामध्ये, "Exhibit Nos. 1 and 2 contain paraffin oil means the exhibit nos. 1 and 2 contain higher boiling petroleum hydrocarbon oils. These oils may be used as base oils for making lubricants. The flash point of exhibit nos. 1 and 2 is 196 °C and 184 °C respectively " असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २१/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी, सहाय्यक पोलिस निरिक्षक, वडाळा टी.टी. पोलिस ठाणे तसेच दोन पंचासह वडाळा ट्रक टर्मिनस विभागातील ओसाड मोकळ्या जागेत रस्त्याच्या आतमधील बाजूला एका ट्रकच्या आडोशाला संशयास्पद हालचाल होत असल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी दोन व्यक्ती नामे सद्दाम अब्दुल हई खान, चालक व केतन सुरज यादव, क्लिनर हे अवधेश ट्रेड लिंक या ट्रान्सपोर्टरकडे काम करीत असल्याचे सांगून

त्यांनी दि.२१/११/२०११ रोजी दुपारी ४.४० वाजता गोदी येथून टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मध्ये ऑईल चलन क्रमांक १९३१५७ अन्वये 7 ON Base Oil एकूण वजन १६.३८० भरुन घेऊन सदरचा माल जय हिंद मिल्स, अकाऊंट विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि., भांडूप, मुंबई येथे घेऊन जाणार असल्याचे सांगितले. दुसरा बेवारस स्थितीमध्ये आढळून आलेला टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ या टँकरचा नॉब उघडलेल्या अवस्थेमध्ये आढळला. परंतू सदर ठिकाणी कोणतीही व्यक्ती आढळली नाही. तसेच टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ मध्ये कोणीही व्यक्ती निदर्शनास आली नाही. परंतू अस्त्यावस्त पडलेले २२० लिटर क्षमतेचे तसेच ३५ लिटर क्षमतेचे काळ्या रंगाचे ड्रम तसेच इतर साहित्य आढळले आहे. दि.२१/११/२०११ रोजी दुपारी ४.४० वाजता ड्रायव्हर सद्दाम अब्दुल हई खान क्लिनर यांच्या समवेत गोदी येथून ऑईल चलन क्रमांक १९३१५७ अन्वये टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मध्ये 7 ON Base Oil एकूण वजन १६.३८० भरुन घेऊन सदरचा माल जय हिंद मिल्स, अकाऊंट विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि., भांडूप, मुंबई येथे घेऊन जाण्यासाठी निघालो असल्याचे सांगितले. घटनास्थळी उपस्थित इसमांनी मिळून सदर टँकरमधून पेट्रोलियम पदार्थ चोरीने काढून तेथील परिसरातील विकत घेणाऱ्या व्यक्तींना विकून येणाऱ्या पैशाचा वापर ते त्यांच्या वैयक्तीक गरजांसाठी करणार असल्याचे त्यांनी अधिकारी व पंचासमक्ष सांगितले. तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ मध्ये आढळून आलेल्या कागदपत्रानुसार सदरच्या टँकरमधील बेस ऑईलचा साठा मे. एशियन ऑईल कंपनी, प्लॉट नं. ५७, जवाहर को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट, कामोठे, पनवेल यांना वितरणासाठी घेऊन जात असल्याचे आढळून आले. तरी घटनास्थळी पेट्रोलियम पदार्थाची अनधिकृतपणे खरेदी, विक्री होत आहे आणि त्यामुळेच भिती पोटी सदर ठिकाणावरील इतर व्यक्ती तेथून पळून गेल्या असाव्यात. अशाप्रकारे घटनास्थळी अधिकाऱ्यांनी दोन्ही टँकर, एक टेम्पो, 7 ON Base Oil चा साठा व इतर मुद्देमाल जप्त करुन संबंधितांविरुध्द उपरोक्त नमूद केल्यानुसार गुन्हा नोंद केला आहे.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ मधील जप्त साठ्याचे मालक म्हणून मे. एशियन ऑईल कंपनी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, दि. १८/११/२०११ रोजी त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५२२८४७७ अन्वये एकूण २२४.४३९ मे. टन 7 ON Base Oil चा साठा आयात केल्याचे सांगितले. तसेच ते वाईट पेट्रोलियम जेली व लाईट लिक्वीड पॅराफिनचे उत्पादक व निर्यातदार असून सदरचे उत्पादन प्लॉट क्र. ५७, जवाहर को-ऑपरेटिव्ह इंडिस्ट्रियल इस्टेट, कामोठे, पनवेल, जिल्हा रायगड येथील फॅक्ट्रीवर केले जात असल्याचे सांगितले. तसेच त्यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ च्या मालकाशी किंवा चालक अथवा क्लिनर

MINING & DIRE… HEAD OFFICE MUMBAI

यांच्याशी संबंध नसल्याचे सांगून सदर टँकरमधील जप्त करण्यात आलेला बेस ऑईलचा साठा मुक्त करण्यास विनंती केली.

तथापी, निवेदनासोबत उद्योग सहसंचालक यांचे कार्यालयाकडून ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ अन्वये परवाना क्र. ८७/०५८९०/डी-२१२३९ दिनांक ०२/०३/२०१३ पर्यंत वैध असलेल्या परवान्याची छायांकित प्रत सादर केली असून त्यासोबत उद्योग सहसंचालक यांच्या पत्रान्वये ल्युब्रिकंटन्स, व्हाईट पेट्रोलियम जेली, यलो पेट्रोलियम जेली, लिक्वीड पॅराफिन, व्हाईट ऑईल हेव्ही, मिनरल ऑईल हेव्ही, ट्रान्सफॉरमर ऑईल या वस्तूंच्या साठवणूक व व्यापारांकरिता परवाना देण्यात आल्याचे नमूद असून सदर परवान्यावर साठवणूक क्षमता १८०० किलो लिटर प्रति वर्ष असल्याचे नमूद आहे. तथापी, मे. एशियन ऑईल कंपनी यांनी सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीवरील 7 ON Base Oil तसेच घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या paraffin oil च्या साठवणूक व व्यापाराकरिता सदर परवान्यावर नोंद नसल्याचे आढळून येत आहे व महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडून पेट्रोलियम पदार्थाच्या साठवणूकीकरिता आवश्यक असणारा साठवणूक परवाना त्यांनी सादर केला नसल्याचे आढळून आले आहे. यावरुन मे. एशियन ऑईल कंपनी यांनी ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ च्या आदेशामधील तरतूदींचा भंग केल्याचे सिध्द होत आहे.

मे. एशियन ऑईल कंपनी यांनी सुनावणीचेवेळी, पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडील साठवणूक परवाना सादर न केल्याने तसेच उद्योग सहसंचालक यांचेकडील प्राप्त परवान्यावर जप्त करण्यात आलेल्या paraffin oil च्या साठवणूक व व्यापाराची परवानगी नसतांना त्यांनी अवैधरित्या बाळगल्याने सदर परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित सहाय्यक व्यवस्थापक श्री. रोहित हलवाई यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी बेस ऑईलचा साठा मे. हायसिज बेसिस ऑईल यांचेकडून खरेदी केला असून तो मुंबई डॉक येथील सिमाशुल्क विभागास सिमाशुल्क भरुन तसेच इतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केल्याचे सांगून प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मधील जप्त बेस ऑईलचा साठा त्यांनी दिनांक ११/११/२०११ रोजी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५१५६१९० अन्वये एकूण २०० मे. टन 7 ON Base Oil चा साठा आयात केल्याचे सांगितले. सदरचा साठा त्यांनी मे. अवधेश ट्रेड लिंक यांना डॉकमधून त्यांचे भांडूप येथील जयहिंद ऑईल मिल येथे नेऊन साठवणूकीकरिता नेमले होते. त्यांचेकडे सदर साठ्याचे मालकीबाबतचे सर्व कागदोपत्री पुरावे

उपलब्ध असून ते सोबत जोडले आहेत. त्यांचे कंपनीचा अथवा कंपनीच्या भागीदारांचा सदरच्या जप्त बेस ऑईल साठ्यासंबंधीच्या गुन्ह्यात सहभाग नसून सदरचा साठा नाशवंत असल्याने पोलिस ठाणेच्या आवारात तसाच पडून राहिल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदरचा साठा लवकरात लवकर मुक्त करुन परत करण्यात यावा असे नमूद केले आहे.

तथापी, मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांनी सुनावणीच्या दरम्यान जप्त करण्यात आलेल्या साठ्याचा उपयोग अथवा त्यांच्या कंपनीकडून त्यापासून होणारे उत्पादन याबाबत काहीच भाष्य केलेले नाही. तसेच पेट्रोलियम पदार्थाच्या साठवणूक व व्यापाराकरिता आवश्यक असणारा ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ या आदेशान्वये परवाना सादर न केल्याने त्यांनी घटनास्थळी जप्त करण्यात आलेला paraffin oil चा साठा हा विनाखरेदी बिलांचा तसेच विनापरवाना अवैधरित्या बाळगल्याचे सिध्द होत आहे.

संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून प्राप्त रासायनिक पृथःकरण अहवालामध्ये जप्त करण्यात आलेला साठा हा "Exhibit Nos. 1 and 2 contain paraffin oil " असे नमूद केले आहे. तथापी, मे. एशियन ऑईल कंपनी व मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. या दोन्ही कंपन्यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीचे छायांकित प्रतिंचे अवलोकन केले असता, त्यामध्ये आयात केलेला साठा हा 7 ON Base Oil असल्याचे नमूद असल्याने पृथःकरण अहवालामधील नमूद पॅराफिन ऑईल याची व्याख्या अथवा दोन्ही पदार्थामधील फरक याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना या कार्यालयाकडून पत्र निर्गमित करण्यात आले. तद्नंतर, संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून प्राप्त अहवालामध्ये, "Exhibit Nos. 1 and 2 contain paraffin oil means the exhibit nos. 1 and 2 contain higher boiling petroleum hydrocarbon oils. These oils may be used as base oils for making lubricants. The flash point of exhibit nos. 1 and 2 is 196 °C and 184 °C respectively" असे नमूद केले आहे.

" Paraffin oil, known as kerosene in Australia and United States and stove oil in Canada is an flammable liquid hydrocarbon burned as fuel. It is most commonly used to power jet engines for aircraft but can also be used for heating, lighting and cooking. Paraffin oil is refined for petroleum and is relatively cheap to produce." तसेच " Paraffin oil, which is referred to as kerosene in the US and Canada, Australia and New Zealand, is a type of petroleum based fuel commonly used in aircraft where it is called jet fuel." अशी व्याख्या नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. एशियन ऑईल कंपनी व मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांनी जप्त साठ्याबाबत पुराव्यादाखल 7 ON Base Oil बाबतचे बिल ऑफ एन्ट्रीच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. तथापी, रासायनिक पृथ:करण अहवालात, जप्त साठा हा paraffin oil असल्याचे नमूद आहे. सदरचा जप्त साठा हा higher boiling petroleum hydrocarbon oils. These oils may be used as base oils for making lubricants असे नमूद आहे. यावरुन बिल ऑफ एन्ट्रीवरील नमूद 7 ON Base Oil चा साठा व घटनास्थळी जप्त करण्यात आलेला paraffin oil चा साठा हे दोन्ही वेगवेगळे पेट्रोलियम पदार्थ असल्याचे संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून प्राप्त अहवालावरुन सकृतदर्शनी दिसून येते. म्हणजेच उपरोक्त दोन्ही कंपन्यांनी सुनावणीच्या दरम्यान सादर केलेले खुलासे व त्यासोबतचे कागदपत्रे हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहेत. आयात केलेला साठा हा 7 ON Base Oil असून प्रत्यक्षात घटनास्थळी जप्त करण्यात आलेला साठा हा paraffin oil असल्याचे सिध्द झाले आहे. नमूद दोन्ही कंपन्यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा त्यांनी सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीवरील साठा असल्याचे ते सिध्द करु शकले नाहीत. सबब, आयात केलेला 7 ON Base Oil चा साठा हा वेगळा असून, दोन्ही कंपन्यांनी जप्त साठ्याच्या पुराव्यादाखल आयात संबंधीचे कागदपत्रे सादर करुन शासनाची दिशाभूल केली आहे. प्रस्तूत गुन्ह्यात मे. एशियन ऑईल कंपनी व मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेला paraffin oil च्या साठ्याची खरेदी बिले अथवा इतर तद्अनुषंगीक कागदपत्रे सादर न केल्याने सदरचा paraffin oil चा साठा हा अवैधरित्या खरेदी केल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, मे. एशियन ऑईल कंपनी यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ मधील तसेच मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मधील जप्त करण्यात आलेला paraffin oil चा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चे मालक मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. या कंपनी यांचे वतीने उपस्थित कन्हैयालाल ब्रिजभुषण मिश्रा यांनी केलेल्या खुलाशात, टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ हा मे. सिल्व्हासा ल्युब्रिकन्टस प्रा.लि. या कंपनीच्या नावे असल्याचे सांगून सदर गुन्ह्यामध्ये त्यांचा अथवा टँकरच्या मालकाचा सहभाग नसल्याने त्यांचा नमूद टँकर जप्त करण्यात येऊ नये. तसेच सदरहू टँकरमधील १६,३८० कि.ग्रॅ. बेस ऑईलचा साठा हा मे. विटमॅन इंडस्ट्रिज प्रा.लि. यांचे मालकीचा असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर त्यांना परत करण्याची विनंती केली आहे. तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक यांचे वतीने उपस्थित संतोष गणपत पाचणेकर यांनी केलेल्या खुलाशात, श्रीमती सुप्रिया संतोष पाचणेकर ह्या सदरहू टँकरचे मालक असून त्यांनी टँकरचे सांभाळ करण्याकरिता त्यांना प्राधिकृत केल्याचे मुखत्यारपत्र दिले आहे. सदरच्या टँकरमधील

१६,८७० कि.ग्रॅ. बेस ऑईलचा साठा मे. एशियन ऑईल कंपनी यांच्या मालकीचा असल्याचे सांगून त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर त्यांना परत करण्याची विनंती केली आहे. प्रस्तूत प्रकरणी घटनास्थळी टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चा चालक व क्लिनर यांना सदर टँकरमधून पेट्रोलियम पदार्थ चोरुन काढत असतांना अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ताब्यात घेतले. तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ या टँकरचा नॉब उघडलेल्या अवस्थेमध्ये आढळून आला. तसेच सदरहू दोन्ही टँकरचे चालक/क्लिनर यांनी संगणमत करुन टँकरमधील साठा हा अनधिकृतपणे काढून त्याच परिसरातील व्यक्तींना विकण्याच्या इराद्याने सदर काम करीत असल्याचे कबूल केले आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ व टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ च्या मालकांच्या अपरोक्ष जरी चालक व क्लिनर यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांच्या वाहनांचा अवैध साठ्याच्या वाहतूकीकरिता गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास दोनही टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे टँकर त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा टँकरचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ चे मालक यांना सुनावणीस पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत अथवा खुलासा सादर केलेला नाही. यावरुन प्रस्तुत प्रकरणी सदर जप्त टेम्पोचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त टेम्पो परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ हा त्यांच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वडाळा टी. टी.

0013
पोलिस ठाणे, वडाळा येथे वि.स्था.गु.र.क्र. १९/२०११, दिनांक २२/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३, टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ व टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ हे शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकांस परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

२) अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ मधील १६८३५ लिटर तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ मधील १६३४५ लिटर paraffin oil चा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

४) घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या २२० लि. क्षमतेचे ८ भरलेले ड्रममधील व ३५ लि. क्षमतेचे ९ भरलेले कॅनमधील पेट्रोलियम पदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

५) सदरचा शासनजमा करण्यात आलेला paraffin oil चा साठा तसेच ड्रम/कॅनमधील पेट्रोलियम पदार्थाचा साठा पोलिसांनी प्रचलित दराने वैध परवानाधारकास विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले २२० लि. क्षमतेचे रिकामे ६२ ड्रम, ३५ लि. क्षमतेचे रिकामे २८ कॅन, २ नग नरसाळे (प्लास्टीक), नरसाळे (पत्रा), लोखंडी पाना, २ नग प्लास्टीक बादली इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

प्रति,
१) टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चे चालक सद्दाम अब्दुल हई खान
२) टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चे क्लिनर केतनं सुरज यादव
३) टँकर क्र. एमएच-०४-डीएस-१५७३ चे मालक
४) टँकर क्र. एमएच-०४-डीडी-५३७६ चे मालक
५) टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१८२९ चे मालक
६) अवधेश ट्रेड लिंक या ट्रान्सपोर्टरचे मालक
७) मे. विटमॅन इंडस्ट्रीज प्रा.लि. चे मालक
८) मे. एशियन ऑईल कंपनीचे मालक
९) अनिल बल्क मुव्हर्स (इंडिया) प्रा.लि., चेंबूर, मुंबई ७४
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.